चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
०८ सप्टेंबर २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## एका आरोपीसह ८ लाख ९१ हजार १५० रूपयाचा सुगंधीत तंबाखू व साहीत्य जप्त

दिनांक ०७/०९/२०२० रोजी स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकास गोपणीय माहीती मिळाली की बल्लारशा येथील इसमाने एका घरात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेले सुगंधीत तंबाखु व तत्सम पदार्थाची अवैध साठवणुक केली असुन त्याची विक्री करणार आहे. अशा माहीती वरून स्थानीक गुन्हे शाखेच्या पथकाने राणी लक्ष्मीबाई वार्ड बल्लारशा येथे पोहोचुन संशयीत इसम नामे निरज रामसेवक साहु वय ४५ वर्षे रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड बल्लारशा यास ताब्यात घेवून त्याच्या ताब्यातील असलेल्या बंद घराची मिळालेल्या माहीतीच्या आधारे झडती घेतली असता घरामध्ये मिराज तंबाखु ३७ पॉकीटे, मजा १०८ हुक्का तंबाखू लहान - मोठे १५४ डब्बे, बाबा १२० खाण्याची तंबाखुचे ५० डब्बे, रजनीगंधा पान मसालाचे ११ बॉक्स, बागबान १३८ खाण्याची तंबाखुचे लहान - मोठे १४१ डब्बे, भगवती झटका पावडर ४७ डब्बे, इगल हुक्का तंबाखुच्या लहान मोठ्या ६५२ पुड्या, व्ही-वन तंबाखु च्या ३०० पुड्या, विमल पान मसाला चे ३११ पॉकीटे, बागबान ४७ खाण्याची तंबाखूचे २५ डब्बे, बागबान १३८ खाण्याची तंबाखु च्या ५३ पुड्या असा एकुण ८,९१,१५०/- रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन बल्लारशा येथे नोंद करण्यात आला असुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ.श्री. महेश्वर रेडडी यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपुर पोलीस निरिक्षक श्री. ओ.जी. कोकाटे यांचे नेतृत्वात सपोनि. बोबडे, पोउपनि. मुंढे, पोउपनि. गदादे, पोहवा. महेंद्र भुजाडे, चापोशि ढाकणे यांनी पार पाडली.

---------------------------------------------------------------